सं. ठाणें
म. ग्रं.
विषय - प्रवास
सं. क्र. ८५.

REFBK-0003237

मराठी दुसऱ्या इयत्तेंतील विद्यार्थ्यांकरितां

माण तालुक्याचें भूवर्णन.

लेखक व प्रकाशक

रघुनाथ ज्ञानोबा देशमाने, दहिवडी,

जि० सातारा.

मुद्रक

गणेश गोविंद देव ' विनोद प्रेस, '

दहिवडी, जि० सातारा.

आवृत्ती पहिली

सन] किंमत दोन आणे [१९२६



माण तालुक्याचें भवर्णन.

भाग पहिला.

REFBK-0003237

REFBK-0003237

दिशा— दिश | प्रकारच्या आहेत. १ **मुख्य दिशा.** २ **उपदिशा.** मुख्य दिशा चार आहेत. **पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर. पूर्व**–ज्या बाजूस सूर्य उगवतो ती पूर्व. **पश्चिम**–ज्या बाजूस सूर्य मावळतो ती पश्चिम. **दक्षिण**–पूर्वेकडे तोंड करून उभें राहिलें असतां उजव्या हाताकडील जी बाजू ती दक्षिण. **उत्तर**–पूर्वेकडे तोंड करून उभें राहिलें असतां डाव्या हाताकडील जी बाजू ती **उत्तर.**

उपदिशा—दोन मुख्य दिशांमधील कोपऱ्यास उपदिशा म्हणतात. उपदिशा चार आहेत. आग्नेयी, नैऋत्य, वायव्य, ईशान्य. **आग्नेयी**—पूर्व आणि दक्षिण ह्या दिशांमधील जो कोपरा तो. **नैऋत्य**–दक्षिण आणि पश्चिम ह्या दिशांमधील जो कोपरा तो. **वायव्य**–पश्चिम आणि उत्तर ह्या दिशांमधील जो कोंपरा तो. **ईशान्य**--उत्तर आणि पूर्व ह्या दिशांमधील जो कोंपरा तो.

नकाशाच्या दिशा:— नकाशा काढते वेळीं उत्तरे कडील बाजू वर लिहण्याचें ठरविलें आहे. म्हणून नकाशा आपल्या समोर धरला

असतां, त्याची वरची बाजू ती उत्तर, खालची बाजू ती दक्षिण, उजव्या हाताकडील ती पूर्व, व डाव्या हाताकडील बाजू ती पश्चिम, या प्रमाणें नकाशाच्या दिशा आहेत.

आकार व विस्तार.

माण तालुक्याचा आकार साधारणपणें अंड्याच्या आकारा सारखा आहे. हा वायव्य दिशेकडून आग्नेयी दिशेकडे असा लांबवर पसरला असून रुंद होत गेला आहे. ह्या तालुक्यांतून **माण** नांवाची नदी ही